**रोजगार हमी योजना/महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना-**
रोहयो कामाचे आर्थिक मापदंड सुधारणे तसेच तांत्रिक सूचना
करण्यासाठी समिती स्थापन करणे.

**महाराष्ट्र शासन**
नियोजन विभाग
शासन निर्णय, क्र. मग्रारो-२०१०/प्र.क्र.९८/रोहयो-१
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : ४ नोव्हेंबर, २०१०

पहा : १) शासन निर्णय नियोजन विभाग, क्र. रोहयो-२००५/प्र.क्र.१८०/रोहयो-६
दिनांक २५ ऑक्टोबर २००५
२) शासन निर्णय, नियोजन विभाग, क्र. मजुरी -२००९/प्र.क्र.१११/मग्रारो-१,
दिनांक ९ नोव्हेंबर, २००९

**प्रस्तावना :-**

रोजगार हमी योजना/महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या कामाचे तांत्रिक व आर्थिक मा. सुधारणे व त्यासंदर्भात मार्गदर्शक सूचना करण्याकरीता शासन स्तरावर वरील संदर्भ क्र. १ च्या शासन निर्णयान्वये तांत्रिक समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीची पुनर्रचना करुन शासन स्तरावर पुढीलप्रमाणे सुधारीत तांत्रिक समिती गठीत करण्याचा निर्णय शासन घेत आहे :-

**शासन निर्णय :-**

रोजगार हमी योजना/महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या कामाचे तसेच पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत मृदसंधारण व कृषि विभागामार्फत. ची कामे विविध योजने अंतर्गत घेण्यात येतात. या कामांचे तांत्रिक व आर्थिक मापदंड सुधारणे व त्यासंदर्भात मार्गदर्शक सूचना तयार करणे इत्यादी बाबीवर शासनाचा सल्ला देण्यासाठी शासन स्तरावर पुढीलप्रमाणे तांत्रिक समिती गठीत करण्यात येत आहे:-

| | | |
|---|---|---|
| १) मुख्य अभियंता व सह सचिव (रोहयो) | - | अध्यक्ष. |
| २) उप सचिव (रोहयो) / उपसचिव (मग्रारोहयो) | - | सदस्य. |
| ३) उप सचिव (जलसंधारण) संबंधित | - | सदस्य. |
| ४) ज्या विभागाचा प्रस्ताव असेल त्या विभागाचे संचालक/सह संचालक/ उप संचालक. | - | सदस्य. |
| ५) एक विशेष कार्य आधिकारी तथा उपविकास आयुक्त,(रोहयो व मग्रारोहयो) | - | सदस्य. |
| ६) कार्यासन अधिकारी ( रोहयो-१) (फक्त रोहयो/मग्रारोहयो अंतर्गत घेणा-या कामासंदर्भात.) | - | सदस्य सचिव. |
| ७) ज्या विभागाचे कामाचे प्रस्ताव असतील त्या विभागाचे / कार्यासनाचे कक्ष अधिकारी | - | त्या विभागाकरीता सदस्य सचिव असतील. |

संबंधित सदस्य सचिवांनी आपआपल्या कामाचे तांत्रिक व आर्थिक मापदंडाचे प्रस्ताव तांत्रिक समितीस परस्पर सादर करावेत. तांत्रिक समितीच्या मान्यतेनंतर प्रस्ताव पुढील कार्यवाहीसाठी उदा. वित्त विभाग व इतर संबंधित विभागाच्या मान्यतेस सादर करावेत व मान्यतेनंतर त्या त्या विभागाने त्याबाबतचे आदेश/निर्णय निर्गमित करावेत. याप्रमाणे समितीची रचना/समिती गठीत करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(बा.बा. नारायणकर)**
**उप सचिव (रोहयो) नियोजन विभाग.**

प्रति,

मा. राज्यपालांचे सचिव,
मुख्यमंत्री/उपमुख्यमंत्री यांचे सचिव,
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
प्रधान सचिव (रोहयो), नियोजन विभाग,
मुख्य अभियंता व सहसचिव (रोहयो) नियोजन विभाग.
उप सचिव (रोहयो) / उपसचिव (मग्रारोहयो) नियोजन विभाग,
उपसचिव (जलसंधारण), ग्रामविकास व जलसंधारण विभाग,
उप सचिव, कृषि विभाग,
उपसचिव, जलसंपदा विभाग,
संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, महाराष्ट्र राज्य, पुणे,
उपसंचालक (कृषि), मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, महाराष्ट्र राज्य, पुणे.
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व विशेष कार्य अधिकारी (रोहयो) तथा पदसिध्द उपविकास आयुक्त (रोहयो)
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
सर्व अधिकारी (रोहयो प्रभाग), नियोजन विभाग,
निवडनस्ती./सारसंग्रह/रोहयो-१.